पुण्य नगरी

# के.बी.पी. कॉलेजला हॅण्डबॉल स्पर्धेत विजेतेपद

**इस्लामपूर / प्रतिनिधी**

येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजने सांगली येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठअंतर्गत सांगली विभागीय पुरुष हॅण्डबॉल स्पर्धेत विजेतेपद मिळवले. स्पर्धेचा अंतिम सामना के. बी. पी. कॉलेज विरुद्ध कला, वाणिज्य व सायन्स कॉलेज पलूस यांच्यात झाला.



इस्लामपूर : हॅण्डबॉलच्या खेळाडूंच्या सत्कारप्रसंगी प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, प्रा. अमितराज माने, प्रा. के आर ठाकरे.

हा सामना के. बी. पी. कॉलेजने पाच गुणांच्या फरकाने जिंकला. या संघाची निवड शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय हॅण्डबॉल स्पर्धेसाठी झाली. स्पर्धा दि. १६ व १७ डिसेंबर रोजी यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर येथे होणार आहेत. यशाबद्दल अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, सुनील पाटील, सरोज पाटील, डॉ. नितीन शिंदे, डॉ. पी. व्ही. गायकवाड, संदीप पाटील, संतोष पाटील, कॉलेजचे सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले. प्रा. डॉ. अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे व अजित पाटील यांचे त्यांना मार्गदर्शन मिळाले.

Sangli Edition
Dec 06, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

दैनिक बातम्यांचा राजा
जनप्रवास
सांगली

# खेळाडुंनी मेजर ध्यानचंद यांचा आदर्श घ्यावा

## डॉ. संजय पाटील



इस्लामपूर : कर्मवीर कॉलेजमध्ये राष्ट्रीय क्रीडादिनानिमित्त बोलताना संजय पाटील मंचावर डॉ. अरुण पाटील, डॉ. नितीन शिंदे, डॉ. अमित माने, डॉ. संदीप पाटील.

जनप्रवास । प्रतिनिधी

इस्लामपूर : खेळावरची निष्ठा कशी असावी, याचे उत्तम उदाहरण म्हणून मेजर ध्यानचंद यांच्या चरित्राकडे पाहिले जाते. हॉकीसारख्या आव्हानात्मक खेळात ध्यानचंद यांनी अनेक विक्रम रचले आहेत. नव्या खेळाडुंनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे. खेळाडू म्हणून ते प्रतिभाशाली होतेच पण भारतीय नागरिक म्हणूनही ते उच्चप्रतीचे देशाभिमानी होते. हिटलर सारख्या हुकुमशहाने अमाप संपत्तीच्या मोबदल्यात जर्मनीच्या बाजूने खेळण्याचा दिलेला प्रस्ताव त्यांनी नाकारला होता, असे प्रतिपादन डॉ. संजय पाटील यांनी केले.

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. प्राचार्य डॉ. अरुण पाटील कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन प्रतिवर्षी क्रीडादिन म्हणून साजरा केला जातो. कॉलेजमध्ये बुद्धिबळ आणि हॉलीबॉल स्पर्धांचे आयोजन केले होते. बुद्धिबळ स्पर्धेत १४ खेळाडुंनी सहभाग नोंदवला. हॉलीबॉल स्पर्धेत कॉलेजमधील एकूण ५ संघांनी सहभाग नोंदवला. दोन्ही स्पर्धेतील गुणानुक्रमे ३ स्पर्धकांना डॉ. पाटील यांच्याहस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. प्राचार्य डॉ. अरुण पाटील म्हणाले, खेळाला अभ्यासाची जोड असली पाहिजे. शैक्षणिक प्रावीण्य खेळाडूंचे व्यक्तिमत्व परिपूर्ण बनवते. विद्यार्थ्यांनी कॉलेजमधील सुविधांचा लाभ घ्यावा. खेळासारख्या आव्हानात्मक क्षेत्रात मुलींनी मागे राहता कामा नये. वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. नितीन शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संतोष पाटील प्रमुख उपस्थित होते. केंद्र शासनाच्या 'फिट इंडिया' योजनेंतर्गत खेळाडुंना यावेळी प्रतिज्ञा देण्यात आली. अजित पाटील यांनी संयोजन केले. डॉ. संदीप पाटील यांनी स्वागत केले. डॉ. अमित माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. सिमंतीनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. कमलेश ठाकरे यांनी आभार मानले.

# केबीपीमध्ये सेल्फ डिफेन्स प्रोग्रामचे आयोजन

प्रतिनिधी

इस्लामपूर

महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये लिड कॉलेज अंतर्गत सेल्फ डिफेन्स प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते. के.एन.पी. कॉलेज वाळवा येथील शारीरिक शिक्षण संचालक तसेच तायक्वांदो या खेळाचे राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक प्रा.सागर साळुंखे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत 'महिलांचे सक्षमीकरणाच्या उद्देशांतर्गत' या कार्यक्रमाचे कॉलेजच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागामार्फत नियोजन करण्यात आले. या कार्यक्रमात कॉलेजच्या ६० मुलींनी सहभाग घेतला. उद्घाटन कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांच्या हस्ते झाले. कॉलेजचे उप-प्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड उपस्थित होते.

प्रा. सागर साळुंखे यांनी मार्गदर्शन करताना सेल्फ डिफेन्स प्रोग्राममध्ये विद्यार्थिनीकडून शारीरिक हालचाली करून घेतल्या. तद्नंतर त्यांनी सेल्फ डिफेन्समधील काही क्लुप्त्या विद्यार्थिनींना प्रात्यक्षिकाद्वारे करून दाखवल्या. यामध्ये हातास पकडल्यास अथवा मानेस पकडल्यास काय करावे, याचा समावेश प्रामुख्याने होता.

महिला सक्षमीकरण हे केवळ एखाद्या प्रशिक्षकाकडून होत नसून स्वतः महिलांनी मानसिकदृष्ट्या निर्भय बनून शारीरिक तंदुरुस्ती कमावली पाहिजे, असे मत प्रा.सागर साळुंखे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी काही विद्यार्थिनींनी मनोगते व्यक्त केली.

या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिमखाना विभागाचे प्रा.डॉ. अमितराज माने, उप-प्राचार्य प्रा. डॉ. संदीप पाटील, प्रा.के.आर.ठाकरे व प्रशासकीय कर्मचारी अजित पाटील यांनी परिश्रम घेतले.



**इस्लामपूर : विद्यार्थिनींना बचावाचे प्रात्यक्षिक सादर करून दाखवताना प्रा. सागर साळुंखे व अजित पाटील.**

जनप्रवास

# क. भा. पा. कॉलेज विभागीय हॅडबॉलमध्ये विजेते

जनप्रवास । इस्लामपूर

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजने सांगली येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठअंतर्गत सांगली विभागीय पुरुष हॅडबॉल स्पर्धेत कला वाणिज्य व सायन्स कॉलेज पलूसला हरवत विजेतेपद मिळवले. या स्पर्धेतून क. भा. पा.च्या या संघाची शिवाजी विद्यापीठअंतर्गत दि. १६ व १७ डिसेंबर २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर येथे होणाऱ्या आंतरविभागीय हॅडबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



■ हॅन्डबॉलच्या खेळाडूंच्या सत्कार प्रसंगी प्राचार्य डॉ.नितीन शिंदे समवेत उपप्राचार्य डॉ.पी.व्ही.गायकवाड, उपप्राचार्य डॉ.संदीप पाटील आदी.

ऋषिकेश रामदास राठोड, शुभम संतोष यमगर, साहिल मोहन चव्हाण, संकेत जोतीराम तांबट, दत्तात्रय बजरंग चौगुले, ओमकार अनिल लाड, प्रणव बाबासो कचरे, प्रथमेश प्रकाश मोरे, प्रथमेश संतोष ओतारी, प्रमोद बबन जाधव, अथर्व श्रीकांत ध, संस्कार सचिन देसाई, प्रशांत तानाजी पाटील, अर्जुन दिलीप जाधव, निलेश राजकुमार कोरे या हॅडबॉल संघातील विद्यार्थी-खेळांडूनी चमकदार कामगिरी केली.

त्यांचे महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील, संस्थेचे सर्व सदस्य, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य संदीप पाटील, उपप्राचार्य संतोष पाटी यांनी अभिनंदन केले. जिमखाना विभागाचे प्रा.डॉ.अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे व अजित पाटील यांचे त्यांना मार्गदर्शन मिळाले.

■ शनिवार, दि. ७ डिसेंबर २०२४ ७

सकाळ



इस्लामपूर : हँडबॉलच्या खेळाडूंच्या सत्कारप्रसंगी कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, डॉ. प्रमोद गंगनमाले आदी.

# कर्मवीर महाविद्यालयाची हँडबॉल स्पर्धेत बाजी

■ सकाळ वृत्तसेवा

इस्लामपूर, ता. ७ : येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजने सांगली येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत सांगली विभागीय पुरुष हँडबॉल स्पर्धेत विजेतेपद मिळवले. गतवर्षीही याच कॉलेजने या स्पर्धेचे विजेतेपद मिळवले होते.

स्पर्धेचा अंतिम सामना कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज विरुद्ध कला वाणिज्य व सायन्स कॉलेज, पलूस यांच्यामध्ये झाला. हा सामना कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजने पाच गुणांच्या फरकाने जिंकला. ऋषिकेश राठोड, शुभम यमगर, साहिल चव्हाण, संकेत तांबट, दत्तात्रय चौगुले, ओंकार लाड, प्रणव कचरे, प्रथमेश मोरे, प्रथमेश ओतारी, प्रमोद जाधव, अथर्व धज, संस्कार देसाई, प्रशांत पाटील, अर्जुन जाधव, नीलेश कोरे या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. या स्पर्धेतून कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय संघाची निवड शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय हँडबॉल स्पर्धेसाठी झाली आहे. या स्पर्धा १६ व १७ ला यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर येथे होणार आहेत. महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, जनरल सेक्रेटरी सरोज पाटील, सदस्य, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य संदीप पाटील, संतोष पाटील यांच्यासह प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. जिमखाना विभागाचे प्रा. डॉ. अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे व अजित पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.

सांगली, रविवार, ८ डिसेंबर २०२४

डक
ग्रामीण भागातील गोरगरीब
विधानसभा क्षेत्र अध्यक्ष
भिजित अनिल मुळीक
सांगली जिल्हा सल्लागार
त्यांचा सत्कार सम्राट
ते. अध्यक्षस्थानी शिराळा



सत्कार करताना जे.

न
व कदम
. (बापू) जाधव
क्रमांक एकच्या
यक्षपदी भीमराव
वेळी कृष्णाकाठ
मानसिंग बँकेचे
नवनिर्वाचित अध्यक्ष
ण्यात आला. यावेळी
जाधव, मानसिंग
क उत्तम धनवडे,
आरबुने, सुरेश
तिरमारे, राजेंद्र माळी,
कार्यकर्ते, पदाधिकारी



टन शिक्षण विस्तार
त आले.

ग्रार्थ्यांना
शमुख
रिअर घडते व
धिकारी बाजीराव
ळेमध्ये केंद्रीय क्रीडा
प कांबळे, सरपंच
चालन केले.
रपंच मोहन मुळीक,
ज पाटील,
, प्रताप गायकवाड



असलेल्या जिल्हा परिषदेमधील लिफ्ट काही दिवसांपासून बंद आहे. परिणामी दिव्यांगांसह वयोवृध्दांचे हाल होत आहेत. या गंभीर विषयांत प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने लोकांतून तीव्र भावना व्यक्त होत आहे.

जिल्ह्यातील अनेक भागातून विविध कामासाठी लोक जिल्हा परिषदेमध्ये दररोज येत असतात. त्यामध्ये दिव्यांगांसह ज्येष्ठ लोकांचाही समावेश असतो. अनेकांचे पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर असलेल्या कार्यालयात काम असते. मात्र लिफ्ट बंद असल्याने दिव्यांगांसह वयोवृध्दांचे हाल सुरू आहेत. काही



**सांगली : जिल्हा परिषदेमध्ये असलेली लिफ्ट बंद पडली आहे.**
(छाया : सचिन सुतार)

जण तर जिन्यावरून बसत-बसत जात आहेत. शरीर साथ देत नसल्याने अनेकांची दमछाक होत आहे. लिफ्टबाबत विचारणा केल्यानंतर गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने लिफ्ट बंद पडत आहेत. त्यामुळे लोक वैतागले आहेत.

लिफ्टच्या देखभालीसाठी महिन्याला सरासरी ८ ते ९ हजार रुपयांचा खर्च अपेक्षित धरून तीन वर्षांसाठी ठेका देण्यात आला होता. मात्र ५ जूनची ठेकेदाराची मुदत संपली आहे. तेव्हापासून देखभालीचा ठेकाच देण्यात आला नाही. यापूर्वी ज्या ठेकेदाराकडे देखभालीची जबाबदारी होती, तो विनामोबदला आमच्या शब्दाखातर दुरुस्ती करत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे.



**इस्लामपूर : मैदानी स्पर्धेतील खेळाडूंचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, प्रा. एस. आर. नांगरे.**

# 'केबीपी'च्या खेळाडूंचे विभागीय मैदानी स्पर्धेत यश

**इस्लामपूर : पुढारी वृत्तसेवा**

सांगली येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत विभागीय मैदानी स्पर्धेत इस्लामपूरच्या महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या खेळाडूंनी विविध क्रीडाप्रकारात विजेतेपद मिळवले.

यामध्ये अथर्व धज याने उंच उडीत प्रथम, प्रमोद जाधव लांब उडीत प्रथम, प्रशांत पाटील गोळाफेकमध्ये तृतीय, संस्कार देसाई ४ बाय ४०० मी. मिक्स रिले तृतीय, अर्जुन जाधव ४ बाय ४०० मी. मिक्स रिले तृतीय, धनश्री माळी ४ बाय ४०० मी. मिक्स रिले तृतीय, तर नम्रता सिंग हिने ४ बाय ४०० मी. मिक्स रिलमध्ये तृतीय क्रमांक मिळवला.

खेळाडूंची निवड शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय मैदानी स्पर्धेसाठी झाली. स्पर्धा डी. आर. के. कॉलेज कोल्हापूर या ठिकाणी होणार आहेत. अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, संस्थेच्या जनरल सचिव सरोज पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य संदीप पाटील, उपप्राचार्य संतोष पाटील, यांनी त्यांना प्रोत्साहन दिले. जिमखाना विभागाचे प्रा. डॉ. अमित माने, प्रा. के. आर. ठाकरे व अजित पाटील यांचे त्यांना मार्गदर्शन मिळाले.

# कर्तबगार, 

## तरुणींच्या अपेक्षा : सां

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

आई-वडिलांना सांभाळून घेणारी मनमिळावू, सुशिक्षित, वधू असावी, अशी अपेक्षा मुलांनी; तर कर्तबगार, नोकरदार, निर्व्यसनी आणि थोडीफार शेती असणारा जोडीदार असावा, अशी अपेक्षा तरुणींनी येथे मराठा समाज संस्थेच्यावतीने आयोजित मेळाव्यात व्यक्त केली.

मराठा समाज सांगली संस्थेचा २५३ वा वधू वर परिचय मेळावा संस्थेच्या कार्यालयात रविवारी झाला, यावेळी या अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या.

सांगली पोलिस स्टेशनचे निरीक्षक संजय मोरे आणि शरदराव तायवाडे-पाटील यांच्याहस्ते हिंदवी

## विज्ञान प्रदर्शनात गोटखिं

**गोटखिंडी :** नेर्ले येथे झालेल्या ५२ व्या विज्ञान प्रदर्शनामध्ये गोटखिंडी विद्यालयाची विद्यार्थिनी दिव्या दशरथ कुलकर्णी हिने माध्यमिक गटात प्रथम क्रमांक मिळविला. प्राथमिक गटामध्ये ऋषिकेश राजाराम घारे याने द्वितीय

# किमान हमीभाव कायद्यासाठी संस

## राजू शेट्टी : चेन्नई येथे तामिळनाडूतील शेतकरी संघटनांचे एमए

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

देशातील शेतकरी किमान हमीभाव कायदा संसदेमध्ये मंजूर करण्यासाठी पुन्हा एकवटू लागला आहे. तामिळनाडू राज्यातून पुन्हा एकदा दिल्लीच्या संसद मार्गावर आक्रमक आंदोलन करण्यासाठी शेतकऱ्यांनी सज्ज राहावे, असे प्रतिपादन एमएसपी गॅरंटी मोर्चाचे



**चेन्नई : येथे तामिळनाडूतील शेतकरी संघटनांच्या एमएसपी गॅरंटी संमेलनात माजी खासदार राजू शेट्टी यांनी भूमिका मांडली.**

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com



इस्लामपूर : मैदानी स्पर्धेतील खेळाडूंचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, प्रा. एस. आर. नांगरे.

# 'केबीपी'च्या खेळाडूंचे विभागीय मैदानी स्पर्धेत यश

**इस्लामपूर : पुढारी वृत्तसेवा**

सांगली येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत विभागीय मैदानी स्पर्धेत इस्लामपूरच्या महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या खेळाडूंनी विविध क्रीडाप्रकारात विजेतेपद मिळवले.

यामध्ये अथर्व धज याने उंच उडीत प्रथम, प्रमोद जाधव लांब उडीत प्रथम, प्रशांत पाटील गोळाफेकमध्ये तृतीय, संस्कार देसाई ४ बाय ४०० मी. मिक्स रिले तृतीय , अर्जुन जाधव ४ बाय ४०० मी. मिक्स रिले तृतीय, धनश्री माळी ४ बाय ४०० मी. मिक्स रिले तृतीय, तर नम्रता सिंग हिने ४ बाय ४०० मी. मिक्स रिलमध्ये तृतीय क्रमांक मिळवला.

खेळाडूंची निवड शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय मैदानी स्पर्धेसाठी झाली. स्पर्धा डी. आर. के. कॉलेज कोल्हापूर या ठिकाणी होणार आहेत. अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, संस्थेच्या जनरल सचिव सरोज पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य संदीप पाटील, उपप्राचार्य संतोष पाटील, यांनी त्यांना प्रोत्साहन दिले. जिमखाना विभागाचे प्रा. डॉ. अमित माने, प्रा. के. आर. ठाकरे व अजित पाटील यांचे त्यांना मार्गदर्शन मिळाले.

पुण्य नगरी

# केबीपीच्या विद्यार्थ्यांची शिवाजी विद्यापीठ संघात निवड

**इस्लामपूर / प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या वतीने आयोजित केलेला २६ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव चंद्रपूर येथे पार पडला. या स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या अथर्व धज याची अथलेटिक्स, देवेंद्र लोळगे याची व्हॉलीबॉल यात शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली. यामध्ये अथर्वने उंच उडी क्रीडा प्रकारात १.९० मी. उडी मारुन रौप्य पदक पटकाविले. या क्रीडा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ अथलेटिक्स पुरुष संघाला सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त झाले. या संघात त्याची निवड झाली तसेच देवेंद्र लोळगे याची विद्यापीठाच्या व्हॉलीबॉल पुरुष संघात निवड झाली.



**अथर्व धज**



**देवेंद्र लोळगे**

या दोन्ही खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष अॅड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, सचिव सरोज पाटील, संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील यांनी कौतुक केले आहे. या विद्यार्थ्यांना डॉ. अमित माने, प्रा. कमलेश ठाकरे, अजित पाटील आदींचे मार्गदर्शन लाभले.

Sangli Edition
Feb 28, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

# 'केबीपी'मध्ये महिला सक्षमीकरणांतर्गत सेल्फ डिफेन्स उपक्रम

**जनप्रवास । इस्लामपूर**

महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये लिड कॉलेज अंतर्गत सेल्फ डिफेन्स प्रोग्रामचे आयोजन केले होते. तायक्वांदोचे राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक प्रा. सागर साळुंखे प्रमुख पाहुणे होते.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत महिलांचे सक्षमीकरणाच्या उद्देशांतर्गत कॉलेजच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागामार्फत नियोजन केले. कॉलेजच्या ६० मुलींनी सहभाग घेतला.



विद्यार्थिनींना बचावाचे प्रात्यक्षिक दाखवताना प्रा. सागर साळुंखे, अजित पाटील.

उद्घाटन कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांच्याहस्ते झाले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थिनींनां या प्रशिक्षणाचे महत्व आपणास सांगून आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर हे प्रशिक्षण तुम्हांस उपयोगी पडेल हे सांगता येत नाही असे मत मांडले. कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड उपस्थित होते.

प्रा. सागर साळुंखे यांनी मार्गदर्शन करताना सेल्फ डिफेन्स प्रोग्राममध्ये विद्यार्थिनीकडून प्रथमतः पूरक शारीरिक हालचाली करून घेतल्या. त्यानंतर सेल्फ डिफेन्समधील काही क्लृप्त्या विद्यार्थिनीना प्रात्यक्षिकाद्वारे करून दाखवल्या.

महिला सक्षमीकरण हे केवळ एखाद्या प्रशिक्षकाकडून होत नसून स्वतः महिलांनी मानसिकदृष्ट्या निर्भय बनून शारीरिक तंदुरुस्ती कमावली पाहिजे असे त्यांनी सांगितले. विद्यार्थिनीनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिमखाना विभागाचे प्रा. डॉ. अमितराज माने, उपप्राचार्य प्रा. डॉ. संदीप पाटील, प्रा. के. आर. ठाकरे, प्रशासकीय कर्मचारी अजित पाटील यांनी परिश्रम घेतले.

सकाळ TODAY

# कर्मवीर महाविद्यालयात स्वसंरक्षण प्रात्यक्षिके

इस्लामपूर, ता. २४ : येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये लीड कॉलेज अंतर्गत स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम झाला. के. एन. पी. कॉलेज वाळवा येथील शारीरिक शिक्षण संचालक; तसेच तायक्वांदो या खेळाचे राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक प्रा. सागर साळुंखे प्रमुख पाहुणे होते. 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' अंतर्गत महिलांचे सक्षमीकरणाच्या उद्देशांतर्गत या कार्यक्रमाचे कॉलेजच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागामार्फत नियोजन करण्यात आले. ६० मुलींनी सहभाग घेतला.

प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांचे हस्ते उद्घाटन झाले. त्यांनी विद्यार्थिनींना प्रशिक्षणाचे महत्त्व सांगून आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर हे प्रशिक्षण तुम्हास उपयोगी पडेल हे सांगता येत नाही, असे मत मांडले. उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. प्रमुख पाहुणे प्रा. सागर साळुंखे यांनी सेल्फ डिफेन्स प्रोग्राममध्ये विद्यार्थिनींकडून प्रथमतः पूरक शारीरिक हालचाली करून घेतल्या.

त्यांनी सेल्फ डिफेन्समधील काही क्लृप्त्या विद्यार्थिनींना प्रात्यक्षिकाद्वारे करून दाखवल्या. यामध्ये हातास पकडल्यास अथवा मानेस पकडल्यास काय करावे, याचा समावेश प्रामुख्याने होतो. महिला सक्षमीकरण हे केवळ एखाद्या प्रशिक्षकाकडून होत नसून स्वतः महिलांनी मानसिकदृष्ट्या निर्भय बनून शारीरिक तंदुरुस्ती कमावली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. जिमखाना विभागाचे प्रा. डॉ. अमितराज माने, उपप्राचार्य प्रा. डॉ. संदीप पाटील, प्रा. के. आर. ठाकरे व प्रशासकीय कर्मचारी अजित पाटील यांनी संयोजन केले.



इस्लामपूर : कर्मवीर महाविद्यालयात स्वसंरक्षण प्रात्यक्षिक सादर करताना प्रा. सागर साळुंखे व अजित पाटील.

हवालदार हवालदार मुल्ला करत आहेत.

दन

# दिशा पाटील हिची शूटिंग संघात निवड

लोकमत न्यूज नेटवर्क



इस्लामपूर : येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील विद्यार्थिनी दिशा राजेंद्र पाटील हिची शूटिंग खेळातील अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली.



दिशा पाटील

महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड.एन.आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील, प्राचार्य डॉ.नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ.पी.व्ही. गायकवाड, उपप्राचार्य डॉ.संदीप पाटील, उपप्राचार्य संतोष पाटील यांनी तिचे अभिनंदन केले. कोल्हापूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतर विद्यापीठ शूटिंग स्पर्धेत तिने २५ मीटर पिस्टलमध्ये प्रथम क्रमांक आणि १० मीटर एयर पिस्टल प्रकारात द्वितीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेतून पंजाब विद्यापीठ, चंडीगड येथे ०५ जानेवारी, २०२५ रोजी होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे.

ील
होते.
टील,
वार,
ोते.
सून
ण
तर
ारी
सून
ली

# वाळव्याची सृष्टी कदम पोलीस उपनिरीक्षकपदी



**वाळवा :** वाळवा गावची कन्या सृष्टी अशोक कदम हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत तिची पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झाली असून ती सध्या नागपूर शहर पोलीस उपनिरीक्षकपदी रुजू झाली आहे. कदम ही गुणवंत खेळाडू व थोर स्वातंत्र्यसेनानी, पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी यांनी स्थापन केलेल्या जिजामाता विद्यालय वाळवा येथील राष्ट्रीय खो-खो पटू आहे.

# कर्मवीरच्या दिशाची आंतर विद्यापीठ शुटींगसाठी निवड

प्रतिनिधी

इस्लामपूर

येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजची विद्यार्थिनी दिशा राजेंद्र पाटील हिची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली. कोल्हापूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतर विद्यापीठ शुटिंग स्पर्धेत तिने २५ मीटर पिस्टल मध्ये प्रथम क्रमांक व १० मीटर एयर पिस्टल प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवला.



स्पर्धेतून पंजाब विद्यापीठ, चंडीगड येथे दि. ५ जानेवारी रोजी होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. तिच्या यशाबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, संस्थेच्या सचिव सरोज पाटील, संस्थेचे सदस्य, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य डॉ.संदीप पाटील, संतोष पाटील, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांनी अभिनंदन केले. जिमखाना विभागाचे प्रा. डॉ. अमितराज माने, प्रा. के. आर.ठाकरे, अजित पाटील यांचे तिला मार्गदर्शन मिळत आहे.



मांगले : क्रीडा ज्योत प्रज्वलित करताना संदीप दिवाण साहेब, विजय पावले, संस्थेचे सचिव मोहन पाटील इ. मान्यवर

# खेळामुळे अष्टपैलू व्यक्तिमत्व

आर. बी. सकटे होते
कमिटी सदस्य माजी
शेळके, शाळा व्यवस्थाप
सचिन ढगे-पाटील, पत्र



वाळवा : नागठाणे बा
महिलांचा या कार्यक्रम प्र

# नागठाण
# सन्मान

वार्ताहर

वाळवा

नागठाणे येथील राज
बालगंधर्व विद्यालयात खेळ
सन्मान महिलांचा हा कार्य
झाला. जीवन विकास
तासगावच्या हिरक महो
सांगता समारंभाच्या
विद्यालयाने या कार्यक्रमाचे
केले होते. या कार्यक्रमाचे
सादरीकरण प्रा.भरत
यांनी केले. स्वागत उज्व
यांनी केले.

अर्चना पाटील यांनी
परिचय करून दिला. स
निलांबरी पाटील यांनी
आभार विमल माने यां

# श्री चौं

## संग्राम देशमु

प्रतिनिधी

पलूस

पलूस मधील श्री.चौंडेश्वरी
सर्वसामान्य व कष्टकरी प
नागरीकांना विश्वासावर अ
पाठबळ देवून स्वत:च्या पा
केले त्यांची आदर्शवत वा